Maharashtra State Board Of
Secondary & Higher
Secondary Education
Latur Divisional Board
Latur-413531

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर
विभागीय मंडळ, लातूर-
४१३५३१

सुतमिल एरिया,कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानन नगर, लातूर

Divisional Chairman Ph :( O) 229258 Divisional Secretary Ph :( O) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com

महत्वाचे / तातडीचे / परीक्षा प्राधान्य

जा.क्र.लाविमं / माध्य.अ / 2196
दिनांक :– 07/01/2026

**प्रति,**

मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा
लातूर / नांदेड / धाराशिव.

**विषयः–** फेब्रुवारी–मार्च 2026 च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.10वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भः–** 1. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण–2016 / प्र.क्र.202 / एस.डी.2 दि. 24 / 11 / 2017

2. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क. कशिम / शारेप / सहा / 2025 / 1300 दि. 04 / डिसेंबर 2025

3. जा.क्र.लाविमं / माध्य.अ / 1727 दि. 18 / 11 / 2025

4. क्र.रा.मं. / परीक्षा–7 / 4610 दि. 24 / 12 / 2025.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्रमांक 1 च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येते. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. 05 मध्ये याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळेकडे दि. 15 डिसेंबर 2025 अखेर व माध्यमिक शाळांनी संबंधित विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख 15 जानेवारी 2026 अशी नमूद आहे.

तथापि, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भिय क्र. 02 च्या पत्रान्वये कळविल्यानुसार शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिडीएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा 2025 चा निकाल जानेवारी 2026 च्या शेवटच्या आठवडयात जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला, लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळांकडे सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ या वर्षापूरतीच देण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह सुधारीत अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| 01 | शाळांनी विभागीय मंडळांकडे प्रस्ताव सादर करणे | दि. 15 जानेवारी, 2026 | दि. 31 जानेवारी, 2026 |

विभागीय सचिव,
लातूर विभागीय मंडळ, लातूर

**प्रत माहितीस्तव :–**

1. मा. सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
2. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर.

**प्रत माहितीस्तव कार्यवाहीसाठी :–.**

1. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परीषद, कार्यालय लातूर / नांदेड / धाराशिव